वाशिम- सुरकंडी येथील दारु अड्ड्यावर SDPO पवन बनसोड यांची धाड, पाच जणांना पकडले, २.१० लाखांचा मुद्देमाल जप्त दि. ११/०४/२०२०

लोकमत

# सुरकंडी येथील दारु अड्ड्यावर धाड!

## पाच जणांना पकडले : २.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : रात्र गस्तीवर असताना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पथकाने ९ एप्रिल रोजी ११ वाजतादरम्यान वाशिम तालुक्यातील सुरकंडी परिसरातील दारु अड्ड्यावर धाड टाकून २.१० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी १० एप्रिल रोजी सहा जणांविरुद्ध मुंबई जुगार ॲक्टनुसार गुन्हे दाखल करण्यात आले.

कोरोना विषाणू संसर्गापासून सावधगिरीचा प्रयत्न म्हणून जिल्ह्यात १५ एप्रिलपर्यंत संचारबंदी लागू आहे. संचारबंदीच्या अंमलबजावणीसाठी वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनचे पथक ९ एप्रिल रोजी गस्तीवर असताना, तालुक्यातील सुरकंडी येथील शेतशिवारात काही इसम अवैधरीत्या सडवा मोहमाच बाळगून दारु विक्री करीत असल्याची गुप्त माहिती ठाणेदार संजय शिपणे यांना मिळाली होती. यावरून पोलीस अधीक्षक वसंत परदेशी यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस अधीक्षक पवन बनसोड ठाणेदार संजय शिपणे व चमूने ९ एप्रिल रोजी रात्री ११ वाजता सुरकंडी शेतशिवारातील दारु अड्ड्यावर धाड टाकली. या शिवारातील नाल्याजवळ काही दुचाकी उभ्या दिसल्या तसेच काही इसम दारु विक्री करण्याच्या उद्देशाने हातात कॅन घेऊन दिसून आले. या ठिकाणी धाड टाकली असता, पाच इसमांना जागीच पकडले. एक इसम अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. याप्रकरणी रफीक कालू नंदावाले (३२), कदीर कालू नंदावाले (६०), हसन जंगली भवानीवाले (६०), जमील रहेमान शेख (४०) सर्व रा. मोहगव्हाण, राहुल रमेश राऊत (२२) रा. वाळकी रोड वाशिम यांना ताब्यात घेतले. फरार झालेल्या इसमाचे नाव अन्सार पिरु नंदावाले रा. मोहगव्हाण असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

घटनास्थळावर सडवा मोहामाच असलेल्या प्लास्टिकच्या ५ टाक्या आढळून आल्या. यावेळी दोन लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपरोक्त सहा जणांविरुद्ध १० एप्रिल रोजी मुंबई दारुबंदी अधिनियम क ६५ ई, फ अन्वये गुन्हा दाखल केला. (प्रतिनिधी)



दारुप्रकरणी आरोपीविरुद्ध कारवाई करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी.

### रिसोड पोलिसांचे गावठी दारुभट्ट्यांवर छापे

भर जहागीर: रिसोड पोलिसांनी शुक्रवारी १० एप्रिल रोजी लोणी बु., मोहजाबंदी येथे गावठी दारुभट्ट्यांवर छापे टाकून गावठी दारुसह मोह सडवा जप्त करून दोघांवर गुन्हा दाखल केला. कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी 'लॉकडाऊन' असतानाही ग्रामीण भागांत गावठी दारुची विक्री करण्यात येत आहे. रिसोड तालुक्यातही हा प्रकार सुरु असल्याचे कळाल्यानंतर पोलीस निरीक्षक अनिल ठाकरे यांच्या मार्गदर्शनात लोणी बीट हद्दीत गावठी दारुभट्ट्यांवर छापे टाकण्यात आले. यात बीट जमादार अनिल कातडे, मुसळे, पवाने, पोलीस उपनिरीक्षक नेमणार यांनी लोणी खुर्द येथे आरोपी राजू नारायण पारवे, तसेच मोहजा बंदी येथे आरोपी विलास नागरे बबन काळे यांच्याकडून ६0 लीटर गावठी दारु आणि ४५0 लीटर मोह सडवा मिळून एकूण ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट केला.